| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २६.०२.२०२० |
| नोंदणी दिनांक | : | २६.०२.२०२० |
| निकाल दिनांक | : | १२.०३.२०२०. |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०० ०० १५ |

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र.२, हिंगोली, जि. हिंगोली.**
**(पिठासीन अधिकारी – श्री. व्हि.व्हि. जोशी)**

**नियमीत फौजदारी प्रकरण क्र. ८४/२०२०.** **निशाणी क्र.१५.**

महाराष्ट्र सरकारतर्फे }
पोलीस ठाणे अधिकारी हिंगोली ग्रामिण, } अभियोगपक्ष
ता. हिंगोली, जि. हिंगोली. }

:: विरुद्ध ::

सुनिल नारायण पाईकराव, }
वय– ४९ वर्ष, व्यवसाय – शेती, }
राहणार खानापुर, तालुका कळमनुरी, } आरोपी
जिल्हा हिंगोली.

---

अभियोगपक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील – श्री. ए.एम. इंगळे
आरोपीतर्फे वकील – श्री. ए.ए. गायकवाड

---

## – न्या य नि र्ण य –

**(आज दिनांक १२ मार्च, २०२० रोजी पारित)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान (यापुढे भा.द.वि.) चे कलम कलम २९४, ३२३ व ५०६(२) प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे**–

२. वादातील घटना दिनांक २२.१२.२०१९ रोजी हिंगोली येथील चौधरी पेट्रोलपंपासमोर जयस्वाल बिअर शॉपीजवळ, तालुका–जिल्हा हिंगोली येथे सार्वजनिक ठिकाणी

घडल्याबाबतची आहे. आरोपी हे खबर देणारचे सासरे असुन खबर देणार व त्यांची पत्नी नामे संध्या यांच्यामध्ये कौटुंबीक वाद आहे. घटनेदिवशी खबर देणार हे घटनास्थळी हजर असतांना आरोपी खबर देणारजवळ आला व "तु माझी मुलगी संध्या हिस फारकत का देत नाही" असे म्हणुन खबर देणारला थापडाबुक्क्याने मारहाण केली, तसेच "तुझ्या मायला झव तुझ्या मायची गांड" अशा अश्लील भाषेत शिवीगाळ करुन आरोपीने खबर देणारला जिवाने मारण्याची धमकी दिल्यावरुन खबर देणारने आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, हिंगोली (ग्रामिण) येथे रिपोर्ट दिली.

३. सदरच्या रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द भा.द.वि. चे कलम २९४, ३२३ व ५०६(२) प्रमाणे गुन्हा क्र. ४३१/२०१९ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्ह्याचा पुढील तपास तपासीक अंमलदार पोलीस हवालदार श्री. एस.एस. वाठोरे, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपासीक अमंलदारने आरोपीला अटक केली, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

**<u>संपरिक्षा आणि पुरावा</u>**–

४. दिनांक २६.०२.२०२० रोजी आरोपीविरुध्द निशाणी क्र. ०९ अन्वये भा.द.वि.चे कलम कलम २९४, ३२३ व ५०६(२) प्रमाणे दोषारोपपत्र तयार करण्यात आले. दोषारोपपत्रामधील आरोप आरोपीला वाचुन व समजावून सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेला तयार झाला, म्हणून खटला पुढे चालविण्यात आला.

५. अभियोगपक्षाचा पुरावा सुरु होण्यापूर्वी खबर देणार श्री संदिप उत्तमराव गायकवाड (अ.सा.क्र.१) व आरोपीने संयुक्त तडजोड अर्ज निशाणी क्र.११ व १२ अन्वये सादर केले व त्यात असे नमूद केले की, त्यांचे न्यायालयाबाहेर आपसी झाले असुन खबर देणार सदरचा मामला न्यायालयासमक्ष चालवू इच्छीत नाही. परंतु, प्रस्तुतचा मामला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३२० प्रमाणे तडजोड करण्यास पात्र नसल्याने खटला पुढे चालविण्यात आला व खबर देणार यांची साक्ष नोंदविण्यात आली. परंतु, खबर देणार हे मुख्य साक्षीदार असून देखिल त्यांनी त्यांच्या पुराव्यात

आरोपीविरुद्ध काहीच कथन केले नाही. आरोपीविरुद्ध गुन्ह्यात गुंतविणारा कोणताच पुरावा आला नसल्याने त्याच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही. त्याअनुषंगाने निशाणी क्र.०१ वर आदेश पारित करण्यात आला.

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला. तो तपासलेले साक्षीदार म्हणजे खबर देणार संदिप (अ.सा.क्र.१) निशाणी क्र.१३ अन्वये.

७. अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री. ए.एम. इंगळे व आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. ए.ए. गायकवाड यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

८. निर्णयासाठी माझ्यापुढे खालीलप्रमाणे विचाराधीन प्रश्न उपस्थित झाले. त्या प्रत्येक विचाराधीन प्रश्नांना मी कारणांसह उत्तरे दिलेत ते खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक २२.१२.२०१९ रोजी हिंगोली येथील चौधरी पेट्रोलपंपासमोर, खबर देणार यांना "तुझ्या मायला झव, तुझ्या मायची गांड" अशा प्रकारची अश्लील शिवीगाळ केली आणि म्हणुन आरोपीने भा.द.वि. कलम २९४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ०२. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने खबरदेणार यांना थापडबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली आणि म्हणून आरोपीने भा.द.वि. चे कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ०३. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने खबर देणार यांना फौजदारीपात्र धाकदपट करुन जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०६(२) प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ०४. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

# कारणमिमांसा

## विचाराधीन प्रश्न क्र. ०१ ते ३ करिता –

९. प्रस्तुत प्रकरणातील मुख्य साक्षीदार **खबर देणार संदिप (अ.सा.क्र.१)** यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, आरोपी त्यांचे सासरे आहेत. घटना दिनांक २२/१२/२०१९ रोजी चौधरी पेट्रोलपंप, हिंगोली येथे सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास घडल्याचे व त्यावेळी ते पेट्रोल पंपाजवळ उभे असतांना आरोपी तेथे आल्याचे, तसेच आरोपीसोबत त्यांची कौटुंबीक वादातुन बोलचाल झाल्याचे, कथन केले. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपीविरुध्द फिर्याद दिल्याचे कथन केले. याव्यतिरीक्त काहीही घडले नसल्याचे, त्यांनी आपल्या पुराव्यात कथन केले. प्रस्तुत साक्षीदाराने अभियोगपक्षाला कोणताही पाठिंबा दिला नसल्याने, विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४ (१) प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्यांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. खबर देणार संदिप (अ.सा.क्र.१) यांनी घटनेनंतर त्यांचे आरोपीसोबत चांगले संबध असल्याचे व आरोपीसोबत त्यांचे न्यायालयाबाहेर आपसी झाल्याचे, मान्य केले आहे.

१०. खटल्यात खबर देणार संदिप (अ.सा.क्र.१) हे महत्वाचे साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षाला पाठिंबा दिला नसल्याने आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेला गुन्हा मुळात नाहीसा झाला. खटल्यात अभियोगपक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाही.

११. फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जाऊन गुन्हा सिद्ध करण्याची पुर्णपणे जबाबदारी अभियोगपक्षाची असते. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन व वर चर्चा केलेल्या कारणांवरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, भा.द.वि.चे कलम कलम २९४, ३२३ व ५०६(२) अंतर्गत असलेला गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जाऊन आरोपीविरुद्ध सिद्ध केले नाहीत, म्हणून मी **विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर**

**नकारार्थी** देतो.

**विचाराधीन प्रश्न क्र. ४ करिता –**

**१२.** विचाराधीन प्रश्न क्र. ०१ ते ३ ला दिलेल्या कारणांवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी **सुनिल नारायण पाईकराव,** यांना भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३ व ५०६(२) च्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचा प्रस्तुत प्रकरणातील जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरुध्द अपील झाल्यास, अपील न्यायालयामध्ये हजर राहण्याकरिता कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरिता आरोपीने रु. १५,०००/– चा जामीनपत्र व वैयक्तिक जात मुचलका न्यायालयामध्ये दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vaibhav Vasantrao Joshi
Date: 2020.03.12 13:02:11 +0530

**दिनांक – १२.०३.२०२०.**
**हिंगोली.**

**(व्हि.व्हि. जोशी )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**कोर्ट क्र. २, हिंगोली, जिल्हा हिंगोली.**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 12.03.2020 |
| Judgment dictated on | : | 12.03.2020 |
| Transcription Ready on | : | 12.03.2020 |
| Judgment checked and signed off | : | 12.03.2020 |

**प्रमाणपत्र**

असे खात्रीपूर्वक कथन करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

टंकलीखीत स्वत: न्यायालयाद्वारे करण्यात आला.